# University of Mumbai

परीक्षा विभाग/विज्ञान कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ(पुर्व),
मुंबई— ४०००९८.

क्र.परीक्षा/विज्ञान / ८५१ /२०१६

परिपत्रक :—

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत व विद्यापीठ संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठ घेत असलेल्या कला विद्याशाखेतील तृतीय वर्षाच्या (Yearly Pattern and Semester Pattern) परीक्षा सलग दोन महिने एवढा दीर्घ कालावधी चालू असतात; तरी हा दीर्घ कालावधी कमी करून सदर परीक्षा ९ दिवसांत पूर्ण करण्याच्या उद्देशाने व या शिक्षणक्रमाच्या वेळापत्रकामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने वेळापत्रकाची रचना नव्याने केली असून; या वेळापत्रकासंदर्भात काही महत्वाच्या सुचना खालीलप्रमाणे नमुद केलेल्या आहे.

सूचना १:— या परीक्षासाठी Single Major विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्या सलग सहा दिवसांच्या परीक्षेला बसणे अनिवार्य राहील. म्हणजेच या विद्यार्थ्यांची परीक्षा पहिल्या ६ दिवसांत पूर्ण होईल.

उदा. एखादा विद्यार्थी या परीक्षेसाठी मराठी हा विषय घेऊन प्रविष्ठ होणार असेल तर त्याची या विषयाच्या पेपर क्र. ४ ते ९ ची परीक्षा पहिल्या ६ दिवसांत घेतली जाईल.

सूचना २:— या परीक्षांसाठी Double Major विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी घेतलेल्या विषयांच्या इंग्रजीतील नावाच्या Alphabetically Order प्रमाणे प्रथम येणाऱ्या पहिल्या विषयाचे ३ पेपरच्या परीक्षेसाठी पहिल्या तीन दिवसांत प्रविष्ठ होणे अनिवार्य राहिल व दुसऱ्या विषयाचे ३ पेपरच्या परीक्षेसाठी शेवटच्या तीन दिवशी प्रविष्ठ होणे अनिवार्य राहिल.

उदा. एखादा विद्यार्थी या परीक्षेसाठी मराठी व इतिहास हे Double Major विषय घेऊन प्रविष्ठ होणार असेल तर Alphabetically Order प्रमाणे प्रथम येणाऱ्या विषयाची म्हणजेच इतिहास या विषयाचे पेपर क्र. ४, ५ व ६ ची परीक्षा पहिल्या ३ दिवसांत म्हणजेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी होईल व मराठी या विषयाचे पेपर ४, ५ व ६ ची परीक्षा शेवटच्या ३ दिवसांत म्हणजेच ७, ८ व ९ व्या दिवशी होईल.

तरी वरील सर्व बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घेऊन आपल्या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या सर्व नियमित व पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्याव्यात.

**(विशेष सूचना :— विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रवेश पत्रावर (Hall Ticket) वर नमूद केलेल्या विषय व तारखांप्रमाणेच परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. या सूचनेचे विद्यार्थ्यांनी तंतोतंत पालन करावे)**

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. १० मार्च, २०१६.

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत व विद्यापीठ संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे सहायक कुलसचिव

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
३. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ३२.
४. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियत्रंक यांचे स्विय सहायक

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक